ठाणे, शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १३७ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

धर्मवादी टीका आणि लोकशाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या निवासस्थानी जाऊन श्री गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर अनेकांनी यावर टीका केली आहे.

.......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...

ePaper PDF

www.maharashtrasamrat.com

तापमान

कमाल	किमान
३६° से	२९° से

बाजार

सोने	चांदी
७३,२८०	९३,६८०

डोकं खाजवा –अशोक सुतार



निवडणुकीपूर्वी मतदारांना आर्थिक मदतीच्या योजना आणून तुम्ही मतदारांना आमिष देताय का ? यावर तुमचे मत ...

थोडक्यात घडामोडी

‘मुख्यमंत्री योजनादूत’ उपक्रमासाठी अर्ज करण्याची शुक्रवारी शेवटची संधी आतापर्यंत १ लाख २० हजाराहून अधिक उमेदवारांची नोंदणी

मुंबई दि. १२ : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी अर्ज करण्याची शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ ही शेवटची तारीख आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख २० हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. उद्या शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज डीलाळीं करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

ज्येष्ठ माकप नेते सिताराम येच्युरी यांचे निधन

वयाच्या ७२ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

दिल्ली : ज्येष्ठ माकप नेते सिताराम येच्युरी यांचे निधन झाले. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या महिनाभरापासून सिताराम येच्युरी यांच्यावर उपचार सुरु होते. त्यांच्यावर दिल्लीतील एम्स रुग्णालयात उपचार सुरु होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते अतिदक्षता विभागात होते.

सिताराम येच्युरी यांचा मूळचा जन्म मद्रासमधील आहे. आयुष्यभर त्यांनी कम्युनिष्ट पक्षाचं काम जोमाने केलं. विशेष म्हणजे भारतात कम्युनिष्ट पक्षाच्या वाढीचा आणि पक्षाला उतरती कळा लागण्याचा काळही येच्युरी यांनी पाहिलेला आहे. सध्याच्या काळाच्या त्यांनी केरळमधील सरकारमध्येही महत्वाची भूमिका बजावली होती. सिताराम येच्युरी यांच्या जाण्याने कम्युनिष्ट पक्षाने बुद्धीवादी चेहरा गमावलाय.

सिताराम येच्युरी यांना १९ ऑगस्ट रोजी एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. तेव्हापासून ते लाईफ सपोर्ट सिस्टमवर होते. मागील काही दिवसांत त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत होती. मात्र, त्यानंतर त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. एम्स रुग्णालयातील डॉक्टरांची टीम सातत्याने त्यांच्यावर लक्ष ठेऊन होती. मात्र, अखेरीस आज त्यांची शेवटचा श्वास घेतलाय.

सीताराम येच्युरी यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुलं असा परिवार आहे. सिताराम येच्युरींनी कॉलेज जीवनापासून राजकारणात सहभाग नोंदवत होते. आणिबाणीच्या काळात त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. तेव्हापासूनच त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या दोन्ही सरकारमध्ये ते सत्तेत सहभागी झाले होते.



राहुल गांधींचे ट्विट

सीताराम येचुरी हे माझे मित्र होते, आपल्या देशाचे सखोल आकलन असलेले भारताच्या कल्पनेचे संरक्षक, अशा शब्दात राहुल गांधींनी त्यांचे वर्णन केले. तसेच, आम्ही केलेल्या दीर्घ चर्चांना आता मी मिस करतोय, या दुःखीप्रसंगी त्यांचे कुटुंबीय, मित्र आणि अनुयायांप्रती माझ्या सहवेदना आहेत, असे ट्विट राहुल गांधींनी केलं आहे.

राजकीय, सामाजिक आणि सिनेसृष्टीतूनही शोक व्यक्त (पान २ वर)

शरद पवारांकडून शोक व्यक्त

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा शिलेदार आज काळाच्या पडद्याआड गेला. ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते सीताराम येचुरी यांची प्राणज्योत मालवली. भारतातील डाव्या पक्षांतील एक महत्त्वाचा आवाज असे त्यांचे कतृत्व सदैव स्मरणात राहील. सीपीआय-एम पक्षाचे सलग दोन वेळा सरचिटणीस पद भूषवणे हे त्यांना त्यांच्या अनुभवामुळेचे शक्य झालं. डाव्या विचारसरणीची ही सर्वात मोठी हानी म्हणावी लागेल. श्रमिक, कामगार आणि शेतकऱ्यांच्या हक्काचा आवाज युचेरी यांच्या जाण्याने हरपला. सीताराम येचुरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे ट्विट शरद पवार यांनी केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भारताचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या निवासस्थानी गणपती पूजनाला हजेरी लावली. त्याप्रसंगीचे छायाचित्र....

मंत्री धर्मरावबाबा आत्रामांची मुलगी भाग्यश्री अखेर शरद पवारांच्या पक्षात

शिव स्वराज्य यात्रा

नागपूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या मुलीने 'दादां'ना मोठा धक्का दिला आहे.भाग्यश्री आत्राम यांनी ‘घड्याळ’ सोडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करुन 'तुतारी' फुंकण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत त्या रिंगणात उतरण्याचे संकेत मिळत आहेत. आपल्या लेकीने असा निर्णय घेतल्यास तिला आणि तिच्या सासरच्या मंडळींना नदीत फेकून देऊ, असा पवित्रा धर्मरावबाबांनी घेतला होती. मात्र भाग्यश्री आत्रामांनी वडिलांच्या भूमिकेला केराची टोपली दाखवत पक्षांतर केले आहे. त्यामुळे बापलेक आमनेसामने आले आहेत...तसंच शरद पवार पक्षात प्रवेश करताच भाग्यश्री आत्राम यांनी वडिल धर्मरावबाबा आत्राम यांना थेट इशारा दिलाय.

भाग्यश्री आत्राम म्हणाल्या , निसर्ग कोपला अन्यथा अधिक मोठा कार्यक्रम केला असता. या क्षेत्रात विकास झालेला नाही.कार्यकर्त्यांना पोहचण्यासाठी अडचणी आल्या.

सुरजागड प्रकल्प / उद्योगाने लक्षात घ्यावे, गाठ माझ्याशी आहे. रस्ते नाही, पूर येतोय, काम करणाऱ्याचे पाय ओढले जातात. या समस्या सुटाव्या यासाठी पक्षप्रवेश केला. (पान २ वर)

माझ्या कार्यकर्त्यांना हात लावू नका, कापून टाकीन; आत्रमांच्या लेकीचा इशारा

मी स्वतः घर सोडून आली आहे, मला घर शोधायचे आहे. मी स्वतः भिंगरी सारखी फिरले. मी आणि बाबा एकच नाही, मी माझा मार्ग वेगळा केला आहे.. बाबा अजूनही राजाप्रमाणे थाटात आहेत, सुधरले नाहीत. आम्हाला कुणी हात धरून शिकविले नाही. मला संधी द्या, सोने करेल. माझ्यासोबत जनता आहे. आता माझ्या कार्यकर्त्यांना धमक्या मिळत आहेत. ते शेर आहेत तर मी शेरनी आहे, माझ्या कार्यकर्त्यांना हात लावू नका, कापून टाकीन, असा इशारा देखील भाग्यश्री आत्राम यांनी दिला.

२०१९ ला बाबा भाजपच्या वाटेवर असताना अजितदादा यांनीच मला बी फॉर्म दिला होता –भाग्यश्री आत्राम

मरीन ड्राईव्ह ते वांद्रे प्रवास अवध्या 12 मिनिटांत

कोस्टल रोड वांद्रे-वरळी सी लिंक कालपासून खुला

मुंबई – मुंबईकरांना ट्रॅफिक पासून दिलासा देण्यासाठी आणि प्रवास अजून सुखकर होण्यासाठी कोस्टल रोड अर्थात किनारा रस्त्याला वरळी – वांद्रे सागरी सेतूशी जोडणाऱ्या पूलाचे उद्घाटन काल (१२ सप्टेंबर) दुपारी २ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस देखील उपस्थित होते. या पुलामुळे मरीन ड्राईव्ह ते वांद्रे हे अंतर अवघ्या बारा मिनिटांत कापता येईल.

मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी कोस्टल रोड हा वांद्रे - वरळी सागरी सेतूला जोडण्यात आला आहे. त्यामुळे मरीन ड्राइव्हवरून वांद्रे या मार्गाचा प्रवास हा तासाभराहून थेट १२ मिनिटांवर आला आहे. शिवाय दक्षिण मुंबई, पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. (पान २ वर)

कोणत्या वेळेत करता येणार प्रवास?

दक्षिण मुंबईहून वांद्रेकडे जाणारी वाहने सकाळी ७ ते रात्री ११ या वेळेत थेट सी लिंकवर जाऊ शकतात. दक्षिण मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना मात्र नियमित मार्गाचा वापर सुरू ठेवावा लागेल.

कोस्टल रोड मरीन ड्राईव्ह ते वर्सोवापर्यंत नेण्याची योजना – मुख्यमंत्री

कोस्टल रोड विकसित करण्यासाठी परदेशातील तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. कोस्टल रोड मरीन ड्राईव्ह ते वर्सोवापर्यंत नेण्याची आमची योजना आहे, असे यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

वेळ व इंधनाची बचत

कोस्टल रोड सी-लिंकला वरळी येथे महाकाय गर्डरने जोडला गेल्याने वांद्रेहून दक्षिण मुंबईत प्रवास करता येणार आहे. यामुळे येथील रोजची होणारी वाहतूक कोंडी कमी होणार आहे. तसेच मुंबईच्या दक्षिण टोकापासून वरळी सी लिंकपर्यंत सिग्नलमुक्त, करमुक्त वेगवान प्रवास करता येणार आहे. या प्रकल्पामुळे ७० टक्के वेळ आणि ३४ टक्के इंधनाची बचत होणार आहे. शिवाय दक्षिण मुंबई, पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

सात दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप....

काल गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या जयघोषात सात दिवसाच्या लाडक्या गौरी-गणपतीला गणेश भक्तांनी भावपूर्ण निरोप दिला. त्यातच ठाण्यातील चेंदनी कोळीवाड्यातील प्रसिध्द देवेंद्र कृष्णा साळेकर यांच्या यंदाच्या १०८ व्या वर्षातील गौर-गणपती विसर्जन मोठ्या थाटात पार पडले. गणरायाला आणि गौरीला विसर्जन घाटावर घेऊन आणताना दुर्मिळ वाहनातून मिरवणूक काढण्यात आली, तर गौरीला सजावट केलेल्या ढकलगाडीवरून आणण्यात आले. त्यामुळे अनेकांचे विशेष लक्ष वेधून घेत होते. (छाया – मनोज सिंह)

चष्म्याचा नंबर घालवण्याचा दावा करणाऱ्या आय ड्रॉपच्या विक्रीचा परवाना दोनच दिवसांत निलंबित

मुंबई– दृष्टीदोष दूर करणारं व चष्म्यापासून कायमची मुक्ती देणारं औषध मुंबईस्थित औषधनिर्मिती करणाऱ्या कंपनीने विकसित केल्याचा दावा केला होता. मुंबईस्थित ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने (डीसीजीआय) या औषधाला मान्यता देखील दिली होती. ‘प्रेस्वू आयड्रॉप’ असं या औषधाचं नाव आहे. गेले दोन दिवस या आयड्रॉपची बरीच चर्चा झाली. मात्र हे औषध भारतीय बाजरात उपलब्ध होण्याआधीच त्यावर कारवाई करण्यात आली आहे. केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेने मायोपिया व हायपरमेट्रोपिया दूर करण्याचा दावा करणाऱ्या आय ड्रॉपच्या विक्रीचा परवाना पुढील नोटिशीपर्यंत निलंबित करण्यात आला आहे.

हा आयड्रॉप प्रेस्बायोपियाने बाधित व्यक्तींसाठी चष्म्यावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विशेषतः विकसित केला गेला आहे, असं कंपनीने म्हटलं होतं. मुंबईस्थित एंटॉड फार्मास्युटिकल्सने मायोपिया व हायपरमेट्रोपियावरील उपचारांसाठी प्रेसव्हू (PresVu) नावाचे आय ड्रॉप्स विकसित केल्याचा दावा केला होता. या आयड्रॉप्सचा नियमित वापर केल्यास डोळ्यांची दृष्टी सुधारून चष्म्यापासून मुक्ती मिळू शकते, असं कंपनीने म्हटलं होतं.

सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायजेशनच्या सब्जेक्ट एक्सपर्ट कमिटीने या उत्पादनाची शिफारस केल्यानंतर एंटॉड फार्मास्युटिकल्सला भारतात ड्रग कंट्रोलर जनरलकडून (जीसीजीआय) मान्यता देखील मिळाली होती. मात्र, सीडीएससीओनेच आता या आय ड्रॉपच्या विक्रीचा परवाना निलंबित केला आहे.

3 ml
Pilocarpine Hydrochloride Ophthalmic Solution USP 1.25% w/v
PresVu
Eye Drops
STERILE

ऑक्टोबरपासून हे औषध मेडिकल्समध्ये उपलब्ध होणार होते...

प्रसारमाध्यमं व समाजमाध्यमांवर चुकीचा प्रचार केल्यामुळे या आयड्रॉपच्या विक्रीचा परवाना निलंबित केला आहे. या आयड्रॉपच्या जाहिरातींनी चष्मा असलेल्या लोकांचं लक्ष वेधलं होतं. या आयड्रॉपच्या असुरक्षित वापराबाबत व लोकांच्या सुरक्षेचा विचार करून सीडीएससीओने पुढील नोटिशीपर्यंत या औषधाच्या विक्रीचा परवाना निलंबित केला आहे. कारण, हे औषध प्रिस्क्रिप्शनवरच खरेदी करता येऊ शकतं. हे ऑषध डोळ्यांच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घेता येईल. मात्र प्रत्येकजण चष्मा घालवण्यासाठी हे औषध खरेदी करेल आणि त्यातून नव्या समस्या निर्माण होऊ शकतात. तशाच पद्धतीच्या बातम्या माध्यमांवर पाहायला मिळत होत्या. कंपनीनेही तशी जाहिरात केली होती. मात्र ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवर हे औषध ३५० रुपये किंमतीत मेडिकलमधून खरेदी करता येईल.

संपादकीय...

संपादक–चंद्रकांत भोईटे

धर्मवादी टीका आणि लोकशाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या निवासस्थानी जाऊन श्री गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर अनेकांनी यावर टीका केली आहे. तसे टीका करण्याचे काही कारण नाही. महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा खटला न्यायालयात त्यामुळेच प्रलंबित राहिला आहे का? असा सवाल शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. तसेच विरोधकांनी न्यायपालिका आणि कार्यपालिकेमध्ये अंतर असायला हवे, अशी भावना व्यक्त केली. यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले आहे. यासाठी त्यांनी माजी सरन्यायाधीश के. जी. बाळकृष्णन आणि माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचा इफ्तार पार्टीतील फोटो पोस्ट केला आहे. फडणवीस यांनी म्हटले आहे की, आधीचे पंतप्रधान त्यांच्या निवासस्थानी इफ्तार पार्टी ठेवायचे आणि त्याला सरन्यायाधीश उपस्थित रहायचे. पण, गणपती आणि महालक्ष्मी पूजनाला मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी गेले तर इतका गहजब का? फडणवीसांनी उठलेला मुद्दा योग्यच आहे. परंतु माजी पंतप्रधान इफ्तार पार्टीचे आयोजन करीत असत, त्यावेळी विरोधकांनी टीका का केली नव्हती, असे फडणवीस यांचे मत दिसते. कुठल्याही गोष्टीत दोन्ही धर्मांत काशी तेढ निर्माण होईल, याची सोय फडणवीस करून नामानिराळे राहतात, असे यातून दिसून येते. असो. हा त्यांच्या राजकारणाचा एक भाग असावा असे वाटते. देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, गणेशोत्सवाची देशभरात सर्वत्र धूम आहे. आस्थेने गणरायाचे पूजन केले जात आहे. गौरी–गणपतीतील महालक्ष्मीपूजन सुद्धा होते. देशाचे सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूडजी यांच्याकडे नुकतीच पंतप्रधानांनी गणरायाची आरती केली आणि महालक्ष्मी पूजन सुद्धा केले. सरन्यायाधीश महाराष्ट्रातील आहेत. दिल्लीत खास महाराष्ट्रीयन व्यक्तीकडूनच ते दरवर्षी गणरायाची मूर्ती पूजेसाठी आणतात. पण अचानक इकोसिस्टीम अशी कार्यान्वित झाली की, जणू आभाळ कोसळले. फरक फक्त इतकाच आहे की, आधीचे पंतप्रधान त्यांच्या निवासस्थानी इफ्तार पार्टी ठेवायचे आणि त्याला सरन्यायाधीश उपस्थित रहायचे. पण, गणपती आणि महालक्ष्मी पूजनाला मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी गेले तर इतका गहजब का? असा सवाल फडणवीस यांनी करून विरोधकांना निरुत्तर केले आहे. फडणवीसांनी विरोधकांना लक्ष्य करत म्हटलेचाही की, हिंदूत्वाला विरोध करता–करता आता गणपती आणि गौरी–महालक्ष्मींना विरोध करण्यापर्यंत विरोधकांची का मजल जावी? प्रश्न गहन आहे. हा महाराष्ट्रीयन सणांचा, महाराष्ट्र धर्माचा, मराठी संस्कृतीचा, गौरी–गणपतींच्या भक्ती आणि श्रद्धेचा अपमान नाही का?, असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. तसेच १८ सप्टेंबर २००९ साली माजी सरन्यायाधीश केजी बाळकृष्णन यांनी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानी आयोजित इफ्तार पार्टीला उपस्थित राहिल्याचे फोटोही पोस्टसह अपलोड करायला फडणवीस विसरले नाहीत. शिवसेना शिंदे गटाचे राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनीही संजय राऊत यांच्या भूमिकेवर टीका केली. मिलिंद देवरा यांनी म्हटले आहे की , गणेश चतुर्थीनिमित्त राजकीय विरोधकही एकमेकांच्या घरी दर्शन घेण्यासाठी जात असतात. मी २० वर्षांपासून हे करत आलो आहे. पंतप्रधान मोदी यांच्या सरन्यायाधीश यांच्या घरी जाण्यावरून जी टीका होतेय, त्याचा स्तर खालावलेला आहे. सत्ताधारी ज्याप्रमाणे विरोधकांवर टीका करतात. तसे सत्ताधारी पक्षांचे नेतेही एखाद्या क्षुल्लक गोष्टीवरून विरोधकांवर टीका करतात असे दिसते. मिलिंद देवरा यांनीही २००९ साली माजी सरन्यायाधीश के. जी. बाळकृष्ण यांनी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीला हजेरी लावल्याचा मुद्दा उपस्थित केला. देवरा म्हणाले की, आता २००९ च्या घटनेवरही तुम्ही टीका करणार का? विरोधक खूपच अपरिपक्व अशी टीका करत आहेत. आरोप करण्यापूर्वी त्यांनी महाराष्ट्राची संस्कृती जाणून घेतली पाहीजे. खरा प्रश्न असा आहे की, इफ्तार पार्टी वा गणेशोत्सव समारंभ असो, दोन्हीही देशातील भिन्न धर्माचे सण आहेत. त्यात कुणी सामील व्हायचे आणि कुणी नाही हे कोणी ठरवू शकत नाही. सध्या धर्मवाद एवढा टोकाचा झाला आहे की, काही नेते त्यात धर्म, जाती शोधत असतात. टीका ही योग्य असावी, ज्याच्यावर टीका झाली आहे, ती खिलाडूपणे मान्य केली पाहिजे. परंतु देश दोन धर्मात वैचारिकरित्या वेगळा करण्याचे कारस्थान नेमके कोण करीत आहे? याचा शोध घेणे महत्वाचे आहे. मुस्लिम नेहमीच वाईट आणि हिंदू नेहमीच योग्य अशी विचारसरणी ठेवणे हे कोत्या मनाचे लक्षण आहे. सत्ताधार्यांना जो अपेक्षित कट्टर धर्मवाद आहे, त्याला विरोधी पक्षाने खतपाणी घालण्याची गरज नसावी असे वाटते. राजकारणात ढवळ्यासंगे पवळा बांधला, वाण नाही पण गुण लागला असे होईल तर लोकशाहीची लक्तरे निघतील. सणाचे निमित्त साधून धार्मिक टीकेची पोळी भाजणाऱ्या दीड शहाण्यांकडून हे समजून घेणे महत्वाचे आहे. अन्यथा टीका – प्रतिटीकेत धर्म ,जाती द्वेष आला की कट्टर धर्मवाद्यांचीच री ओढण्याचे पातक होईल आणि हेच लोकशाहीत घातक आहे.

जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

☆ मिळकट नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस
☆ तहसिल जाहीरनामा
☆ हस्तांतर करार नोटीस
☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४,
कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

आता अटल सेतू मार्गावरुन एनएमएमटीची धाव

नवी मुंबई – नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे अर्थात एनएमएमटीचे वातानुकूलित अतिजलद नवीन बसमार्ग क्र.११६ नेरुळ बस स्थानक (पूर्व) ते मंत्रालय मार्गे उलवे, शिवाजीनगर टोल नाका तसेच बसमार्ग क्र.११७ खारघर से.३५ ते मंत्रालय मार्गे पनवेल, पळस्पे, गव्हाण टोल नाका अशी बससेवा अटल सेतू (MUMBAI TRANS HARBOUR LINK) या मार्गावरुन आज गुरुवार, दिनांक. १२ सप्टेंबर २०२४ पासून तुर्भे आगारातून सुरु करण्यात येत आहे. या मार्गाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

बस मार्ग क्रमांक ११६ – प्रवर्तन – तुर्भे आगार, बससंख्या – ०१ वातानुकूलित, प्रवासकाळ– ९५ ते १०० मिनिटे, प्रवर्तन काळ – सोमवार ते शनिवार, प्रवास भाडे – रु.२३०/–, प्रवासमार्ग – नेरुळ बसस्थानक, सागरदिप सोसायटी / शुश्रूषा हॉस्पिटल, आगरी कोळी संस्कृती भवन, से.४२ ए बस स्थानक / गायमुख चौक, नमुंमपा मुख्यालय, मोठा उलवा गाव, शगुन रियालटी चौक, बामणडोंगरी रेल्वे स्थानक, उलवे प्रभात हाईट्स, शिवाजीनगर / अटल सेतू टोल नाका, शिवडी–न्हावासेवा अटल सेतू मार्गे शिवडी, डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानक, वाडीबंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल / जीपीओ, गोल्डनगेट / डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, एल.आय. सी. / मंत्रालय डाऊन., प्रवासस्थान – नेरुळ बसस्थानक ते मंत्रालय – ७.५५, मंत्रालय ते खारकोपर रेल्वे स्थानक – ९.४५, खारकोपर रेल्वे स्थानक ते मंत्रालय –१७.२०, मंत्रालय ते नेरुळ बस स्थानक – १८.२५

बस मार्ग क्रमांक ११७ – प्रवर्तन – तुर्भे आगार, बससंख्या – ०१ वातानुकूलित, प्रवासकाळ– ११५ ते १०० मिनिटे, प्रवर्तनकाळ – सोमवार ते शनिवार, प्रवासभाडे – रु.२७०/–, प्रवासमार्ग – खारघर से. ३५ सर्कल उत्सव चौक, स्पॅगेटी / घरकुल, कळंबोली सर्कल, आसुडगाव आगार, पनवेल एसटी बस स्थानक, भिंगारी, पळस्पेफाटा, महात्मा फुले विद्यालय / करंजाडे फाटा, गव्हाण टोलनाका, शिवडी – न्हावासेवा अटल सेतू मार्गे शिवडी, डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानक, वाडीबंदर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल / जीपीओ, गोल्डनगेट / बाबासाहेब आंबेडकर चौक, एल. आय. सी / मंत्रालय (डाऊन), प्रवास स्थानक – खारघर से.३५ ते मंत्रालय – ७.४०, मंत्रालय ते खारघर से.३५ –१८.१५ तरी नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

अनेक वर्षांपासूनची पाण्याची समस्या सुटल्यामुळे

निजामपूरा येथील स्थानिक रहिवाश्यांनी केला पालिका आयुक्तांचा सत्कार

भिवंडी शहरातील निजामपूर भागात गेले अनेक वर्षापासून पाण्याची समस्या भेडसावत होती. अनेक वेळा त्या भागात टँकरने पाणी पुरवठा केला जात होता. पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने तेथील नागरिक पाण्याच्या समस्या करीता हैराण झाले होते. ही बाब स्थानिक नागरिक व माजी नगरसेवक फराग (बाबा) बावउद्दीन यांच्या अधिपत्याखाली पालिका आयुक्त अजय वैद्य यांची भेट घेवून पाण्याची समस्या लक्षात आणून दिली.

पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी या तक्रारीची तातडीने दखल घेवून पाणी पुरवठा अभियंता संदीप पटनावर यांना तातडीने सदर विभागातील पाण्याची समस्या दूर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पाणी पुरवठा विभागाने सदर पाईप लाईनची पाहणी केली व अत्यावश्यक त्या दुरूस्त्या करून पाणी पुरवठा सुरळीत केला. त्या प्रित्यर्थ निजामपूरा येथील स्थानिक नागरिक यांनी व माजी नगरसेवक फराग (बाबा) बावउद्दीन यांच्या नेतृत्वाखाली पालिका आयुक्त अजय वैद्य यांची भेट घेवून त्यांचा सत्कार केला.

त्यावेळी पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी मनोगत व्यक्त करताना सांगीतले की. नागरिकांच्या समस्या सोडविणे हे पालिका प्रशासनाचे काम आहे. जर निजामपूरा भागात गेले अनेक दिवस टँकरने पुरवठा केला जात होता. ही बाब चांगली नाही. सदर पाण्याची लाईन दुरूस्त करण्यात आली त्यामुळे निजामपूर भागातील आज टँकर बंद करण्यात व पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला. तसेच निजामपूरा भागातील बुबेरे सांस्कृतिक केंद्र दुरूस्तीचे काम देखील सुरू करण्यात आली आहे.

पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी नागरिकांनी अनधिकृत नळ कनेक्शन घेवू नयेत. नळ कनेक्शन मंजुर करून घ्यावीत. तसेच अनधिकृत बांधकामे करू नयेत, परवानगी घेवूनच बांधकाम करावीत. तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत एकल प्लॅस्टीकचा वापर टाळावा. आपला घराचा व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवावा. स्वच्छता ही सेवा आहे या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच शहराच्या विकासाकरीता नागरिकांनी कर भरून पालिकेस सहकार्य करावे असे आवाहन देखील पालिका आयुक्त अजय वैदय यांनी केले. या कामात महत्वाची भुमिका बजावणारे पालिका प्र.शहर अभियंता सचिन नाईक, प्र.कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा संदीप पटनावर, अभियंता विनोद मते, अभियंता सर्फराज अंसारी यांचा देखील चांगले काम केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

महापालिकेने अवघ्या २५ दिवसात दुर्गाडी येथे गणेश घाटावर तयार केला पर्यायी रस्ता..!

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दुर्गाडी येथील गणेश घाटावर घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मूर्तीचे मोठ्या प्रमाणात विसर्जन होते. यासाठी दुर्गामाता चौकातून गणेश घाटाकडे जाणारे दोन रस्ते होते–एक मार्ग प्रवेशासाठी आणि दुसरा मार्ग बाहेर येण्यासाठी वापरला जात होता. तथापि, चालू वर्षी नेव्हल म्युझियमच्या बांधकामामुळे या मार्गांपैकी एक मार्ग कायमस्वरूपी बंद करण्यात आला होता. यामुळे विसर्जनासाठी येणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्गाची गरज निर्माण झाली होती.

महापालिकेने पर्यायी मार्ग तयार करण्याचा निर्णय घेतला असून रिंग रोडवरील सीएनजी पेट्रोल पंपापासून दुर्गाडी गणेश घाटाकडे नवीन रस्ता तयार केला आहे. हा रस्ता ११५.०० मीटर लांबीचा आणि १५.०० मीटर रुंद आहे. २.७० मीटर उताराच्या भागात रिटेनींग वॉल बनवून माती भराव करण्यात आली आहे. पावसाळ्यात नाल्याच्या पूलाचे काम चालू ठेवण्यात आले. नाल्यावर सहा फुट व्यासाचे चार पाईप टाकून पूल बांधला आहे. रस्त्याचे काम पेव्हर ब्लॉक वापरून पूर्ण करण्यात आले आहे.

■ सर्व कामांसाठी महापालिकेने २ कोटी रुपयांचा खर्च मान्यता दिली आहे. महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली असून श्री गणेशोत्सवाच्या आधी हे काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, दिवसरात्र काम करून हा नवीन रस्ता २५ दिवसांच्या कमी कालावधीत पूर्ण करण्यात आला आहे.

■ तथापि, रस्त्याचे कॉक्रीटीकरण सुमारे २० ते २५ मीटरचे कॉक्रीटचे काम अनंत चतुर्दशी झाल्यानंतर पूर्ण केले जाईल. या दरम्यान कामकाजाची गुणवत्ता आणि जलदगती यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. तसेच घाटाच्या आसपासच्या क्षेत्रात आवश्यक सुविधा, जसे की पाणी पुरवठा, स्वच्छता व्यवस्थापन, आणि सुरक्षेच्या उपाययोजना सुनिश्चित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती शहर अभियंता अनिता परदेशी यांनी दिली.

■ श्री गणेशोत्सव हा कल्याण डोंबिवली क्षेत्रातील प्रमुख आणि आनंददायी सण आहे, ज्यात भक्तगण मोठ्या उत्साहाने श्रीगणेश मूर्तीचे पूजन करतात आणि विसर्जनाच्या दिवशी मोठ्या जल्लोषात मूर्ती गणेश घाट येथील खाडीत विसर्जित करतात. विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी आणि वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते, त्यामुळे स्थानिक नागरिकांना आणि प्रवाशांना अडचणी येतात. महापालिकेने घेतलेल्या उपाययोजनांमुळे या समस्येवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे शक्य होईल आणि गणेशोत्सव अधिक सुव्यवस्थित आणि आनंददायी होईल.

अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रात पाच दिवसाच्या १२९७ गणेशमूर्तीचे विसर्जन

अंबरनाथ – अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रातील पाच दिवसाच्या गणेशमूर्तीचे विसर्जन बुधवारी भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.पर्यावरणभिमुख गणेशोत्सवाची संकल्पना राबवून राज्यात पर्यावरण भिमुख गणेशोत्सवाचा आदर्श घालून देणाऱ्या अंबरनाथ नगरपरिषदेच्या पर्यायी गणेश विसर्जन व्यवस्थे अंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये गणेशमूर्तीच्या विसर्जनाला भाविकांनी याही वर्षी चांगला प्रतिसाद दिला. तसेच दीड दिवसांपासून १७ सप्टेंबरला अनंत चतुर्दशीपर्यंत विसर्जन निविपार पडावे यासाठी नगरपरिषदेचे सुमारे ३२ कर्मचारी आहेत. विसर्जनासाठी ८ नैसर्गिक स्थळासह एकूण ८ कृत्रिम स्थळे आहेत.

विसर्जनाची आकडेवारी

विसर्जन स्थळ	संख्या	गणेश मूर्ती संख्या
१) नैसर्गिक	(८)	७३९
२) कृत्रिम तलाव	(८)	५५८
एकूण	=	१२९७

साकीनाका आगीत दोन मजुरांचा मृत्यू झाल्याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

मुंबई – २६ मार्च २०२३ रोजी साकीनाका येथील मेट्रो जंक्शनवर असलेल्या पेनिन्सुला हॉटेलसमोरील राजश्री हार्डवेअर नावाच्या कारखान्यात शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती. या आगीत एकूण ११ जण भाजले, त्यापैकी दोन मजुरांचा मृत्यू झाला. मात्र या मजुरांच्या कुटुंबीयांना अद्याप कोणतीही भरपाई देण्यात आलेली नाही. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते रुपेश रवी ढोणे यांनी मुख्यमंत्र्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करून मृतांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्यात स्थानिक अधिकारी वारंवार हलगर्जीपणा दाखवत असल्याची मागणी केली आहे. राजश्री हार्डवेअर कारखाना कोणाच्या मदतीने स्थापन झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई, दक्षता विभाग, विभागीय तपास अधिकारी आणि आर्थिक गुन्हे शाखा मुंबई यांना या तक्रारीसह तपशील ईमेलद्वारे देण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रुपेश रवी ढोणे यांना कारवाई पुढे करण्याचे उत्तर दिले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी आणि हा बेकायदेशीर कारखाना उभारणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर एफआयआर नोंदवावा, अशी मागणी रुपेश रवी ढोणे यांनी केली आहे.

कोस्टल रोड वांद्रे–वरळी सी लिंक कालापासून खुला

(पान १ वरून) टप्प्याने मार्ग खुला – १४ हजार कोटींपेक्षा जास्त बजेट असलेला कोस्टल रोड प्रकल्प टप्प्याटप्प्याने सुरू होत असून आता चौथ्या टप्प्याचे उद्घाटन झाले आहे. कोस्टल रोडचा दक्षिणेकडील भाग ११ मार्च रोजी वरळी ते मरीन ड्राईव्हपर्यंत खुला झाला होता. तर, मरीन ड्राइव्हपासून हाजी अलीपर्यंतचा उत्तरेकडील मार्ग १० जून रोजी खुला झाला. त्यानंतर, ११ जुलै रोजी हाजी अली ते वरळीपर्यंतचा मार्ग कार्यान्वित झाला.

मंत्री धर्मरावबाबा आत्रामांची मुलगी भाग्यश्री अखेर शरद पवारांच्या पक्षात

(पान १ वरून) शासनाकडून आदिवासी विकासाला निधी येतो , तो पूर्ण खर्च होत नाही, आदिवासी प्रकल्पात गर्दी होत नाही. **२०१९ ला बाबा भाजपच्या वाटेवर असताना अजितदादा यांनीच मला बी फॉर्म दिला : भाग्यश्री आत्राम** – भाग्यश्री आत्राम म्हणाल्या , धर्मरावबाबा आत्राम माझे वडील आहेत, मी आशीर्वाद घेईन. मागच्या सभेत मला नदीत ढकलून देण्याची भाषा केली, ते चुकीचे होते, मंचावर अजितदादा होते, महिला आयोग अध्यक्षा होते, तरीही बोलले. मी घर फोडून जात नाहीये, धर्मरावबाबा नक्षल तावडीत होते तेव्हा शरद पवार यांनी मध्यस्थी केली. मी त्यांच्या उपकाराची परतफेड केली. अजितदादा यांनी म्हटले चूक झाली. तुम्हीच शरद पवार गटात या, चूक सुधारा. मी शरद पवार यांचे ऋण विसरू शकत नाही. २०१९ मध्ये अजितदादा म्हणाले भीक मागायला आले की तिकीट मागायला. २०१९ ला बाबा भाजपच्या वाटेवर असताना अजितदादा यांनीच मला बी फॉर्म दिला आणि घर फोडून उभे रहा असे म्हटले याला जयंत पाटील साक्षीदार आहे.

कोण आहेत भाग्यश्री आत्राम? – भाग्यश्री आत्राम हलगेकर या २००३ – २००४ मध्ये भारती विद्यापीठ पुणे येथे बीएस्सीचे शिक्षण घेत होत्या. दरम्यान धर्मराव बाबा आत्राम यांच्या .पत्नी स्नेहादेवी धर्मराव आत्राम यांच्या नागपूर इथे असलेल्या नातेवाईकांनी ऋतुराज यांचा लग्न संबंध जुळवून आणला होता. ऋतुराज हलगेकर हे मूळचे कर्नाटक येथील बेळगावचे रहिवासी आहेत. धर्मराव बाबा आत्राम यांना हा संबंध आवडला आणि १० फेब्रुवारी २००८ मध्ये दोघांचं लग्न शाही पध्दतीने नागपुरात लावून दिले.

मागील लोकसभा निवडणुकीत मंत्री धर्मराव बाबा आत्राम हे निवडणूक लढण्यास इच्छुक होते. त्यामुळे अहेरीची जागा खाली होणार होती. त्या जागी मुलगी भाग्यश्री आत्राम लढणार अस चर्चा ही सुरू झाली. मात्र बाबा आत्राम यांना राष्ट्रवादीकडून तिकीट मिळू शकले नाही आणि मुलीचे स्वप्न भंगले. तेव्हापासून कुटुंबात सत्तासंघर्षाला सुरुवात झाली. परिणामी, धर्मरावबाबा आत्राम यांची मुलगी व जावईच त्यांना आता आव्हान देणार आहे.

राजकीय, सामाजिक आणि सिनेसृष्टीतूनही त्यांच्या निधनानंतर शोक व्यक्त

(पान १ वरून) सीताराम येचुरी यांचे निधन झाल्यानंतर देशभरातून शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. राजकीय, सामाजिक आणि सिनेसृष्टीतूनही त्यांच्या निधनानंतर शोक व्यक्त करत त्यांच्या कार्याच्या आठवणी जागवल्या जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार (Sharad Pawar) यांनीही त्यांच्या निधनानंतर शोक व्यक्त करत, कामगार, शेतकऱ्यांचा हक्काचा आवाज हरपल्याचे म्हटले आहे.

कमल हसन यांनीही ट्विट करुन दुःख व्यक्त केलंय. भारतीय राजकारणातील दिग्गज कॉम्रेड सीताराम येचुरी यांचे निधन झाल्याचे ऐकून अतिशय दुःख झाले. विद्यार्थी कार्यकर्ता ते राजकारणी असा त्यांचा प्रवास असून आपल्या भाषणातून त्यांनी राजकारणावर वेगळीच छाप सोडली आहे, त्यांच्या कुटुंबियांप्रती आणि हितचिंतकांबाबत सहवेदना व्यक्त करतो, निरोप कॉम्रेड, असे कमल हसन यांनी म्हटलं. आहे.

नवी मुंबई महानगरपालिका
विद्युत विभाग
निविदा सुचना क्र.कार्यकारी अभियंता,(विद्युत-1)/ 12 /2024-25

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकिय रक्कम (रू.)
1	यशवंतराव चव्हाण मैदान येथील विद्युत विषयकबाबींचे दुरुस्ती करणे.	10,80,134/-
2	नेरुळ विभागातील कुकशेतगांव येथील गावदेवी मैदानात स्टेडीअमलाईट लावणे.	7,19,700/-
3	वाशी सेक्टर-8 बालगोपाल मैदान येथे दिवाबत्तीची सोय करणे.	8,35,023/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि.13/09/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे..

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
संजीव पाटील
कार्यकारी अभियंता (विद्युत) परिमंडळ-1
जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/378/2024 नवी मुंबई महानगरपालिका

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका
ई- निविदा सुचना —
मुदतवाढ १

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेकडील बसेसकरीता आवश्यक बॉशपंप व इंजेक्टर दुरुस्ती मायकोचे अधिकृत सर्व्हिस स्टेशन यांचेकडुन कामे करणेकामी एक वर्ष कालावधीकरिता कामी दोन लिफाफा पध्दतीने ठामपा/पिआरओ/परिवहन/४०९/२४-२५ दि.०२.०९.२०२४ नुसार शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑन लाईन निविदा मागविण्यात आली होती सदर निविदेस दिनांक १८/०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यत मुदतवाढ देण्यात येत असून सदरच्या निविदा दिनांक १८/०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यत स्विकारल्या जातील. व शक्य झाल्यास दिनांक २०/ ०९/२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यत उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/ ४८१/२४-२५
दि. १२.०९.२०२४
सही/-
परिवहन व्यवस्थापक
परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे
PLS VISIT OUR OFF. WEBSITE
www.thanecity.gov.in

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

- ■ पदाचे नाव :
  १ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
- ■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
- ■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
- ■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- ■ फी : फी नाही.
- ■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
- ■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

सभासद व्हा
....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क :
9892305888

भारतीय रेल्वे

- ■ पदाचे नाव :

१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर

- ■ शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्युपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques)
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)

- ■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे

- ■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- ■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
- ■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
- ■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
- ■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

युनियन बँक ऑफ इंडिया

- ■ पद क्र. अप्रेंटिस
- ■ शैक्षणिक पात्रता: पदवीधर
- ■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- ■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- ■ Fee: General/OBC: 800/- SC/ST: 600/-, PWD:400/-
- ■ महत्त्वाच्या तारखा:
  अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ सप्टेंबर २०२४
- ■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
- ■ अधिकृत वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/

इंडियन ओव्हरसीज बँक

- ■ पद क्र.
  अप्रेंटिस
- ■ पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी
- ■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- ■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- ■ Fee: General/OBC: 944/- SC/ST: 708/-, PWD:472/-
- ■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ सप्टेंबर २०२४
- ■ अधिकृत वेबसाईट https://www.iob.in/

उत्तर रेल्वे

- ■ पदाचे नाव :
  १ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
- ■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
- ■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- ■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
- ■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
- ■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
- ■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी 'महावाचन उत्सव'

मुंबई : व्यक्तिमत्व विकासाचे तसेच सृजनशीलता वाढीस लागण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे वाचन! वाचनामुळे आनंद मिळतो. विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी त्यांना पुस्तकांकडे आकर्षित करावे आणि लहान वयातच वाचनाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागामार्फत महावाचन उत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात ११ सप्टेंबर, २०२४ पर्यंत ९६,६३९ (८८.९५ टक्के) शाळांमधून १२,३०,५५७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असल्याची माहिती, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर.विमला यांनी दिली आहे.

मोबाईल, टीव्ही, संगणक आदी स्क्रीनच्या वेडामुळे हल्ली मुले वाचनाच्या आनंदापासून दूर जाताना दिसत आहेत. अशावेळी त्यांना पुन्हा पुस्तकांच्या सहवासात आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने महावाचन उत्सव या उपक्रमाची सुरुवात केली आहे. हा उपक्रम २० सप्टेंबर, २०२४ पर्यंत सुरू राहणार आहे.

महावाचन उत्सवाचे ब्रँड ॲम्बेसेडर अमिताभ बच्चन

मागील वर्षी राज्यातील सर्व शाळांमध्ये 'महाराष्ट्रातील वाचन चळवळ' हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये ६६ हजार शाळा व ५२ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याची पडताळणी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' मार्फत करण्यात आली होती. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. हा प्रतिसाद लक्षात घेऊन सन २०२४-२५ या वर्षी देखील रिड इंडिया यांच्या सहकार्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाकरीता ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात असून त्यांनी देखील सर्वांना दररोज किमान १० मिनीटे नवीन काही वाचनाचे आवाहन केले आहे.

राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील इयत्ता तिसरी ते बारावी इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी व नववी ते बारावी असे तीन गट निश्चित करण्यात आले आहे.

उपक्रमाची उद्दिष्टे

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे. दर्जेदार साहित्याचा व लेखक, कवींचा विद्यार्थ्यांना परिचय करुन देणे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना देणे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व भाषा संवाद कौशल्य विकासास चालना देणे ही या उपक्रमाची उद्दिष्टे आहेत.

उपक्रमाचे स्वरुप

या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी www.mahavachanutsav.org या नावाने वेब प्लीकेशन विकसित करण्यात आले असून राज्यातील सर्व शाळा नोंदणी करीत आहेत. सहभागी विद्यार्थ्यांनी आवडत्या पुस्तकाचे वाचन करुन वाचन केलेल्या पुस्तकाविषयी अभिप्राय लेखन करावयाचे आहे. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना वाचन केलेल्या पुस्तकाविषयी अभिप्राय देण्यासाठी एका मिनिटाचा व्हिडिओ/ ऑडिओ क्लिप अपलोड करण्याची सुविधादेखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या उपक्रमासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक हे राज्यस्तरीय नोडल अधिकारी असून जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) व तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत हा उपक्रम राविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राबाबत ही जबाबदारी संबंधित समकक्ष अधिकाऱ्यांची असणार आहे.

परिक्षण व पारितोषिके

विद्यार्थ्यांनी वाचन केलेल्या पुस्तकाबाबत लिखित स्वरुपात मांडलेल्या विचारांच्या आधारे मूल्यांकन करण्यात येऊन प्रत्येक स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची निवड तीन गटांसाठी स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे. विजयी विद्यार्थ्यांना पुस्तक स्वरुपात पारितोषिक तर सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

ग्रंथ प्रदर्शन/ पुस्तक मेळाव्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना नवनवीन पुस्तकांची माहिती मिळावी व वाचनास प्रोत्साहित करावे या उद्देशाने यावर्षी प्रत्येक तालुक्यात ग्रंथ प्रदर्शन / पुस्तक मेळावे घेण्यात आले आहेत. या मेळाव्यात त्या-त्या जिल्ह्यातील सार्वजनिक व खाजगी ग्रंथालयांना तसेच विविध प्रकाशकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असल्याची माहिती श्रीमती आर. विमला यांनी दिली आहे.

ज्येष्ठांची काळजी घेणारी मुख्यमंत्री वयोश्री योजना

मनः स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे त्यांचे ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना वयोमानपरत्वे भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर मात करुन त्याचे जीवनमान सुखकर करण्याकरिता राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांकरिता 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी २४ लाख असून त्यापैकी सद्यस्थितीत ६५ वर्षे व त्यावरील अंदाजे एकूण १ कोटी ५० लाख ज्येष्ठ नागरिक आहेत. आज मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारपणाचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने सुरू केलेल्या योजनेच्या धर्तीवर दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) संबंधित दिव्यांग, दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे पुरविण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे.

योजनेचे स्वरुप:

ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी- ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर आदी सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येणार आहेत. मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योगोपचार आदीचा लाभ घेता येईल.

या योजनेकरिता राज्य शासनातर्फे १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी ३ हजार रुपयांच्या लाभ देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक विभाग तसें राज्य शासनाद्वारे नोंदणीकृत योगोपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेता येणार आहे.

लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष:

ज्या नागरिकांची दि.३१ डिसेंबर २०२३ अखेर वयाची ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे नागरिक या योजनेकरिता पात्र समजण्यात येतील.

ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधारकार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधारकार्ड नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांकडे आधारकार्ड नसल्यास ओळख पटविण्यासाठी इतर स्वतंत्र ओळख दस्तऐवजही ग्राह्य धरण्यात येणार येईल.

लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयाच्या आत असणे आवश्यक असून याबाबत लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करावे. निवड किंवा निश्चित केलेल्या जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असणार आहे. अर्जदाराने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे आदीच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.

पात्र लाभार्थ्यांच्या बँकच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे देयक तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करावे.

अर्जासोबत आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे योजनेचे लाभ घेण्यासाठी आवश्यक असणार आहे.

योजनेची अंमलबजावणी:-

लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे आदी कामे नोडल एजन्सी, केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.

लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरिता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीद्वारे लाभार्थ्याची निवड करण्यात येणार आहे.

ही योजना वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्या दूर करून आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

६५ वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ४था मजला, दत्तवाडी, स्वामी समर्थ मठासमोर, कळवा (प.), (दूरध्वनी क्रमांक ०२२-२५३४१३५९ (ईमेल-acswothanegmail.com) या पत्त्यावर सादर करावा.

-मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये शतकीय संघांचा सहभाग

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेचे आयोजन क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे यांच्या सहकार्याने करण्यात आले असून या स्पर्धा फा.ग्रल स्पोर्टस सेंटर, सेक्टर १०, वाशी येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाल्या. विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतून १४, १७ आणि १९ वर्षाआतील मुलांच्या गटात ६३ संघ आणि मुलींच्या गटात ३९ संघ असे एकूण १०२ संघ या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते.

या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात दिल्ली पब्लिक स्कुल, नेरुळ शाळेचा संघ पोद्दार केम्ब्रिज स्कूल, नेरुळ यांच्यावर ३:१ अशा सेटने मात करीत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात डी.ए.व्ही.पब्लिक स्कूल, ऐरोली यांनी ३:१ अशा सेटने क्राईस्ट अकॅडमी, कोपरखैरणे संघाला पराभूत केले.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात फा.ग्रल स्कूल, वाशी या संघाने ३:० अशी माध्यमिक विद्यालय, विवेकानंद संकुल, सानपाडा संघावर सरळ सेटनी मात करीत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रतेची बाजी मारली. तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात ३:२ अशा सेटने जिंकत पोद्दार सी.बी.एस.ई स्कुल, नेरुळ शाळेने न्यू होरायझन पब्लिक स्कूल, ऐरोली या संघावर विजय संपादन केला.

स्पर्धेतील १९ वर्षांखालील मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात फा.ग्रल स्कुल, वाशीहा संघ शिरवणे ज्युनिअर कॉलेज, नेरुळ यांच्या संघावर ३:१ अशा सेटने विजय मिळवत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठी डी.ए.व्ही. पब्लिक स्कूल,ऐरोली यांनी रिलायन्स फाउंडेशन स्कुल, कोपरखैरणे यांच्यावर ३.२ अशा सेटने विजयश्री संपादन केली.

१४ वर्षांखालील मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात अमिटी इंटरनॅशनल स्कूल, सीबीडी, बेलापूर यांनी ए.पी.जे.स्कूल, नेरुळ यांच्यावर ३:० अशा सेटने मात करीत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेची पात्रता गाठली. रायन इंटरनॅशनल स्कूल, सानपाडा ही शाळा रिलायन्स फाऊंडेशन स्कूल, कोपरखैरणे यांच्यावर ३:१ अशा सेटने मात करीत तिसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटामध्ये फा.ग्रल स्कूल, वाशी यांनी व्ही.पी.एम. स्कूल, ऐरोली यांच्यावर ३:० अशा सरळ सेटने सामना जिंकत पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. या गटातील तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात ए.पी.जे. स्कूल, नेरुळ हे ३:२ अशा सेटने रायन इंटरनॅशनल स्कूल, सानपाडा यावर मात करीत जिंकले.

१९ वर्षांखालील मुलींच्या गटातील अंतिम सामना ए.पी.जे. स्कूल,नेरुळ आणि दिल्ली पब्लिक स्कूल,नेरुळ यांच्यात झाला. त्यामध्ये ३:१ अशा सेटने दिल्ली पब्लिक स्कूल, नेरुळ शाळेचा संघ पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. या गटातील तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी डॉ.डी.वाय.पाटील इंटरनॅशनल स्कूल, नेरुळ ही शाळा रिलायन्स फाऊंडेशन स्कूल, कोपरखैरणे यांच्यावर ३:२ अशा सेटनी मात करीत ठरली.

नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत प्रत्येक वर्षागणिक मोठया संख्येने शाळांचा सहभाग वाढत असल्याने क्रीडा विभागाच्या प्रयत्नांना यश येत असल्याचे दिसून येत आहे. जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्या संघांना पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शुभेच्छा प्रदान केल्या आहेत.

'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रमासाठी

अर्ज करण्याची आज शेवटची संधी

आतापर्यंत १ लाख २० हजाराहून अधिक उमेदवारांची नोंदणी

मुंबई : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी अर्ज करण्याची शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ ही शेवटची तारीख आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख २० हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. उद्या शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !

गणपती बाप्पा मोरय्या, गणेश उत्सव मंगलमूर्ती मोरय्या

शिवसेना ठाणे शहरप्रमुख हेमंत पवार यांच्या निवास्थानी विराजमान झालेल्या श्री गणरायाचे दर्शन घेताना खा. श्रीकांत शिंदे व गोपाळ लांडगे

महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाणे शहरप्रमुख हेमंत पवार यांच्या घरी विराजमान झालेल्या गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले.

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे दिवा शहर प्रमुख सचिन राम पाटील यांच्या निवासस्थानी बाप्पा विराजमान.

ठाणे महानगरपालिका मा. नगरसेविका नम्रता जयेंद्र कोळी यांनी विभागातील गणरायांचे दर्शन घेतले.

सत्यम कॉलनीचा राजा - कैलास नगर शंकर पावशेर रोड कल्याण ईस्ट येथील श्रींची मूर्ती

गणेशोत्सवातील आनंदाचा शिधा लाटला

शिधा विकण्यासाठी नेत असताना जप्त, दोघांवर गुन्हा

अंबरनाथः राज्यातील गोरगरीब जनतेला सण उत्सवांच्या काळात मदत म्हणून अवघ्या शंभर रूपयात सहा जिन्नस असलेला एक अन्न धान्याचा संच दिला जातो. परंतु या संचातील शिधा काळाबाजारात विकण्यासाठी नेला जात असल्याचा धक्कादायक प्रकार अंबरनाथमध्ये समोर आला आहे. सामाजीक कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे हा साठा पकडण्यात आला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून शिधावाटप दुकानाला टाळे ठोकण्यात आले आहे.

राज्य सरकारच्या माध्यमातून काही सण उत्सवांच्या काळात अंत्योदय शिधापत्रिका असणाऱ्यांना सहा अन्न धान्य असलेला एक संच सवलतीच्या दरात म्हणजे शंभर रूपयांत दिला जातो. त्यामुळे सण उत्सवांच्या काळात गोरगरीब जनतेला त्याचा फायदा होता. आचारसंहितेमुळे गेल्या तीन महिन्यात हा शिधा देता आला नव्हता. त्यामुळे आता गणेशोत्सवाच्या तोंडावर हा शिधा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अंबरनाथ शहरातही अशाप्रकारे आनंदाचा शिधा आणि पंतप्रधान योजनेतील शिधा शिधावाटप दुकानांमध्ये देण्यासाठी आला होता. येथील पूर्वेतील महालक्ष्मी नगर येथील शिधावाटप दुकान क्रमांक ४६ एफ १ या दुकानातील हा शिधा एका टेम्पोमधून बाजारात विक्रीसाठी नेला जात होता. याची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते प्रवीण गोसावी यांनी हा टेम्पो अडवून हा गैरप्रकार उघडकीस आणला. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी टेम्पो आणि त्यातील शिधा जप्त केला. शिवाजीनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी सुभाष भारती आणि कुदनकुमार गुप्ता या दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी चार लाख ३५ हजार रूपयांचे विविध अन्न धान्य जप्त केले आहे. अपहार करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या साठ्यात एक लाख १४ हजार रुपयांचा २ हजार ८७५ किलो तांदूळ, ५ हजार ५७० रुपये किमतीचे प्रधानमंत्री पिशवी ५५७ नग, अंत्योदय साखर १० किलो, साडी २ नग, ७०० रुपये, ७६,५०० रुपये किमतीचा आनंदाचा शिधा यात रवा, साखर, चनाडाळ, तेल प्रत्येकी एक किलो, २७ हजार रूपये किमतीचा आनंदाचा शिधा प्रकारातील २७० नग तेल अशा जिन्नसाचा समावेश आहे.

रोह्यातील साधना कंपनीत स्फोट

२ कामगारांचा मृत्यू, चार जण गंभीर जखमी

अलिबागः रोह्यातील साधना नायट्रोकेम कंपनीत सकाळी सव्वा अकराच्या सुमारास स्फोट झाला. ज्यात दोन कामगारांचा मृत्यू झाला असून अन्य चार जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रोह्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

धाटाव औद्योगिक वसाहतीमधील या रासायनिक कंपनीतील ओडीबीटू प्लांट मधील मिथेनॉल साठवण टाकीवर वेल्डींगचे काम सुरू होते. एम. के. फॅब्रिकेटर ठेकेदार कंपनीचे सहा कामगार या ठिकाणी उपस्थित होते. काम सुरु असतांनाच अचानक साठवण टाकीचा स्फोट झाला. ज्यात दोन कामगारांचा मृत्यू झाला तर चार जण गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रोहा येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच, अग्निशमन दल, पोलीस आणि महसुल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत.

यंदाचा गणेशोत्सव बचत गटांसाठी आर्थिक फलदायी

विविध वस्तू आणि खाद्यपदार्थ विक्रीतून १५ लाखांहून अधिकची आर्थिक उलाढाल

ठाणे : गणेश उत्सवासाठी लागणाऱ्या शोभेच्या वस्तू, मखर, विद्युत रोषणाई, हाताने बनविलेल्या फुलांच्या टोपल्या यांसह विविध खाद्य पदार्थांची यंदा महिला बचत गटांकडून मोठ्या प्रमाणात विक्री करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नागरिकांकडूनही घरगुती वस्तूंनाच प्राधान्य दिले गेले असल्याने बचत गटांना यंदाचा गणेशोत्सव आर्थिक दृष्ट्या फलदायी ठरला असून जिल्ह्यातील महिला बचत गटांची सुमारे या वस्तू विक्रीतून १५ लाख रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, कल्याण, भिवंडी या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बचत गट कार्यरत आहेत. जिल्ह्यातील बचत गटांची संख्या सुमारे दहा हजार इतकी असून यामध्ये एक लाख महिला जोडल्या गेल्या आहेत. मागील काही वर्षांमध्ये ठाणे जिल्ह्यातील या बचत गटांच्या माध्यमातून विविध लघुउद्योग, मध्यमउद्योग सुरू करण्यात आले आहेत. यातून बचत गटातील महिलांनाही एक सक्षम रोजगार उपलब्ध झाला आहे. तर या महिलांनी मिळून सुरू केलेल्या लघु आणि मध्यम उद्योगातून त्यांच्या आसपासच्या परिसरातील महिलांना देखील रोजगार उपलब्ध झाला आहे. गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी या उत्सवांच्या काळात या बचत गटांनी बनवलेल्या विविध वस्तूंना तसेच खाद्यपदार्थांना मोठी मागणी असते. गतवर्षीप्रमाणे यंदाच्या गणेशोत्सवात देखील या बचत गटांनी तयार केलेल्या विविध शोभेच्या वस्तूंना आणि खाद्यपदार्थांना मोठी मागणी आहे. उपहारगृहांमध्ये भेसळयुक्त मिठाईची भीती, मिठाईचे वाढलेले दर, तसेच फराळाच्या वाढलेल्या किंमती यामुळे यंदा अनेक भाविकांनी आणि मंडळांनी घरगुती पद्धतीने बनविलेल्या फराळ आणि मिठाईला पसंती दिली आहे. यामध्ये बचत गटाने तयार केलेल्या खाद्यपदार्थांचा अधिकतर समावेश आहे. त्याचबरोबर बांबूसह इतर पर्यावरण पूरक गोष्टींचा वापर करून तयार करण्यात आलेल्या शोभेच्या वस्तूंची ही यंदा बचत गटांकडून मोठ्या प्रमाणात विक्री करण्यात आली आहे. यामुळे महिलांना मोठा आर्थिक लाभ झाला आहे. तसेच गणेशोत्सव सुरू होऊन अद्याप दोनच दिवस झाले आहेत. या कालावधीत महिला बचत गटांकडून वस्तू आणि खाद्य पदार्थांच्या विक्रीतून तब्बल १५ लाख रुपयांहून अधिकची आर्थिक उलाढाल करण्यात आली आहे. तर या महिलांनी तयार केलेल्या खाद्य पदार्थाना अद्यापही मागणी सुरूच असल्याची माहिती अंबरनाथ तसेच कल्याण येथील बचत गटांच्या महिलांनी सांगितले. यामध्ये विधवा आणि निराधार बचत गटांच्या देखील मोठ्या प्रमाणात समावेश आहे. या सर्व बचत गटांकडून मखर, कागदी फुलांच्या माळा, फुलांच्या टोपल्या, दिव्याचा वाती, तेल, अगरबत्ती, धूप, तूप यांसह विविध खाद्यपदार्थ यांची विक्री केली जात आहे.

राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील महिला बचत गटांना जिल्हा परिषदेच्या वतीने खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात आले आहे. बचत गटांना झालेल्या या पतपुरवठ्यामुळे सर्व महिलांना त्यांचे लघु आणि मध्यम उद्योग अधिक सक्षम करण्यास मोठा हातभार लागला. त्यामुळे आज शेकडो बचत गट विविध उद्योगांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळवत असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली आहे.

पाणी बिलाची थकबाकी ठेवणाऱ्यांवर

पालिकेची कारवाई

शिळ-दिवा भागात कारवाईत ०६ मोटर पंप जप्त, ११ नळ जोडण्या खंडित

ठाणे : ठाणे महापालिकेची पाणी बिल थकबाकी वसुलीकरता पाणी पुरवठा विभागाने कारवाई सुरू केली आहे. या मोहिते शिळ-दिवा भागात ०६ मोटर पंप जप्त करण्यात आले. तर, ११ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. पाणी बिलाची रक्कम भरून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

थकीत बिलावरील प्रशासकीय आकारात सूट

महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळ संयोजनाच्या थकीत देयकाची चालू वर्षाच्या मागणीसह पूर्ण भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट लागू करण्यास महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मान्यता दिली आहे. थकीत पाणीपट्टी बिलावरील दंडात १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहीर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. ही योजना ०१ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

पाणी बिलाची थकबाकी न भरल्यास नळ जोडणी खंडित करून पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले असून बिलाच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. पाणी बिलाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर रुम सील करण्यात येत आहेत. तसेच, पाणी बिलाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.

किरकोळीत 'घाऊक' लूट

घाऊक बाजारात दोन ते पाच रुपयांची दरवाढ; किरकोळीत भाज्यांचे दर दुप्पट

ठाणे : वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) घाऊक बाजारात भाज्यांच्या दरात दोन ते पाच रुपयांनी वाढ झाली आहे. परंतु किरकोळ बाजारात ५० ते ६० रुपये किलो असणाऱ्या भाज्या १०० ते १२० प्रतिकिलो दराने विक्री करून सर्वसामान्यांची लूट केली जात आहे. दरम्यान, वातावरणातील बदलांमुळे भाजीची आवक कमी झाल्याने भाजी महागल्याचा दावा विक्रेत्यांनी केला. 'एपीएमसी'त पुणे, नाशिक, कोल्हापूर येथून भाज्यांची आवक होत असते. तसेच गुजरात, कर्नाटकातून पुरेशा प्रमाणात भाज्यांची आवक होते. 'एपीएमसी'तील भाजीपाल्याच्या घाऊक बाजारात दररोज ७०० च्या आसपास गाड्या दाखल होतात. परंतु बुधवारी ५६० गाड्या दाखल झाल्या.

वातावरणातील बदलामुळे भाजीचे उत्पादन कमी प्रमाणात होते. त्यामुळे आवक काही प्रमाणात कमी होत असल्याने भाज्यांचे दर वधारल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. घाऊक बाजारात भाज्यांच्या दरात दोन ते पाच रुपयांनी वाढ झाली आहे. परंतु किरकोळ बाजारात ५० ते ६० रुपये किलो असणाऱ्या भाज्या १०० ते १२० प्रतिकिलो दराने विकल्या जात आहेत. घाऊक बाजारात मटार १९ रुपये प्रति किलो, तर किरकोळीत ३२० रुपये किलो या दराने विकली जात आहे. तसेच ३२ रूपये किलो फ्लॉवरचे दर किरकोळीत १२० रूपये किलो आहेत.

पावसामुळे भाज्यांचे खराब होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्याचबरोबर गणेशोत्सव असल्याने भाज्यांच्या दरात वाढ झाली आहे.
-विजय साहू, किरकोळ भाजी विक्रेते, ठाणे

वातावरण सतत ढगाळ असल्याने भाजीचे उत्पादन कमी येते. त्यामुळे भाज्यांची आवक घटल्याने दरात वाढ झाली आहे.
-नाना बोरकर, भाजी व्यापारी(अध्यक्ष), वाशी कृषी उत्पन्न बाजार समिती

घाऊक बाजार दर(प्रतिकिलो)

भेंडी	४० रुपये
फुलकोबी	३२ रुपये
घेवडा	५२ रुपये
कारले	३१ रुपये
ढोबळी मिरची	३३ रुपये
वांगी	३७ रुपये
मेथी	१७ रुपये
मटार	१८ रुपये

भाजी -	आता -	पूर्वी (प्रतिकिलो)
मटार	३२० रुपये	१६० रुपये
फ्लॉवर	१२० रुपये	६० रुपये
कारले	१०० रुपये	६० रुपये

२७ गावांमधील पथदिवे कामांसाठी फेरनिविदा

कल्याण : कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीतील २७ गावांमधील २६ कोटींची कामे घेण्यासाठी राजकीय पाठबळ असलेल्या ठेकेदारांमध्ये जोरदार चढाओढ सुरू होती. यात स्थानिक आणि नामवंत कंपन्या पालिकेने स्पर्धेतून काही कारणे देऊन बाहेर काढल्या होत्या. याविषयी 'लोकसत्ता'ने वृत्त प्रसिद्ध करताच, आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. हे काम स्पर्धात्मक निविदा पद्धतीने करण्यास सांगून या कामाच्या फेरनिविदा मागविण्याचे आदेश विद्युत विभागाला दिले.

शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून पर्यावरणशील दृष्टीकोन जपणाऱ्या नागरिकांचा

'पर्यावरणमित्र' प्रशस्तिपत्राने सन्मान

नवी मुंबई : 'इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव' साजरा करण्याच्या नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आवाहनास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद लाभला असून शाडूच्या मूर्ती प्रतिष्ठापना करणाऱ्या गणेशभक्तांना स्वच्छता व पर्यावरणमित्र प्रशस्तिपत्र देऊन सर्वच विसर्जनस्थळी सन्मानित करण्यात आले. पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपणाऱ्या नागरिकांना प्रशस्तिपत्राव्दारे प्रोत्साहित करणाऱ्या महानगरपालिकेच्या या अभिनव संकल्पनेचे भाविकांकडून मोठया प्रमाणात स्वागत करण्यात आले. याव्दारे सर्वच नागरिकांमध्ये पर्यावरण जपणूकीचा संदेश प्रसारित होईल अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली.

५ व्या दिवशीच्या गणेशमूर्ती विसर्जन प्रसंगी महानगरपालिकेने २२ नैसर्गिक आणि १३७ कृत्रिम अशा एकूण १५९ विसर्जन स्थळांवर केलेल्या चोख व्यवस्थेत ७९४० गणेशमूर्तींचे विसर्जन निर्विघ्नपणे पार पडले. महानगरपालिकेच्या व्यवस्थेची घरगुती व सार्वजनिक मंडळे यांच्यासोबत आलेल्या भाविक भक्तांनी प्रशंसा केली.

नमुंमपा क्षेत्रातील २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांवर ५९०२ घरगुती तसेच ११३ सार्वजनिक मंडळांच्या ६०१५ श्रीमूर्तींचे विसर्जन संपन्न झाले. तसेच १३७ कृत्रिम विसर्जन स्थळांवर १९१४ घरगुती तसेच ११ सार्वजनिक मंडळांच्या १९२५ श्रीमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. अशाप्रकारे ७८१६ घरगुती व १२४ सार्वजनिक मंडळांच्या एकूण ७९४० श्रीमूर्तींचे विसर्जन सुरळीतपणे पार पडले. यामध्ये शाडूच्या ११८५ मूर्तींचे पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत भावपूर्ण विसर्जन करण्यात आले.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी केली

नमुंमपाच्या स्वच्छताविषयक कामाची प्रशंसा

नवी मुंबई : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी आज नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयास भेट देत महानगरपालिकेच्या वतीने सुरु असलेल्या स्वच्छता कामांची तसेच स्वच्छतामित्र व सफाईमित्र यांच्यासाठी महानगरपालिका करीत असलेल्या कामाची प्रशंसा केली. यापुढील काळात अधिक चांगले काम होईल असा विश्वास व्यक्त करीत त्यांनी काही मौल्यवान सूचनाही केल्या.

याप्रसंगी उपस्थित सामाजिक सल्लागार गिरेंदर नाथ व समन्वयक संदिप चरण यांचाही सन्मान करण्यात आला. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड आणि विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांचे स्वागत केले. यावेळी आयुक्तांनी महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक कार्याची आणि सफाई कर्मचाऱ्यांसाठी करण्यात येत असलेल्या कामाची व सोयीसुविधांची सादरीकरणाव्दारे माहिती दिली. महानगरपालिका स्वच्छताकर्मींचा उल्लेख स्वच्छतामित्र व सफाईमित्र करते, यामुळे स्वच्छताकर्मींच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होते याची दखल सदस्य महोदयांनी घेतली.

यावेळी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक विविध वाहनांची व यंत्रसामुग्रीची प्रत्यक्ष पाहणी केली व सफाईमित्रांशी थेट संवाद साधला. इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबई महानगरपालिकेचे काम खूप पुढारलेले असून याठिकाणी स्वच्छता कामगारांच्या सुरक्षेची व आरोग्याची विशेष काळजी घेतली जात असल्याबद्दल डॉ.पी.पी.वावा यांनी समाधान व्यक्त केले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771